# कथाकथन स्पर्धेत महिमा गवस हिचे यश



दोडामार्ग (पुढारी वृत्तसेवा) : दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या महिमा आत्माराम गवस हिने कुडाळ येथे मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या ५५ व्या युवा महोत्सवात कथाकथन स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले आहे. मुंबई विद्यापीठाचा ५५ वा युवा महोत्सव यावर्षी कुडाळ येथील संत राऊळ महाविद्यालयामध्ये झाला. जिल्ह्यातील ३७ पैकी ३५ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. कथाकथन प्रकारात हळबे महाविद्यालयाच्या महिमा गवस हिने सुहास बारटके लिखित 'खरा नागरिक' ही कथा सादर केली होती. तिच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. पी.डी. गाथाडे, डॉ. एस. एन. खडपकर, डॉ. एस. एन. जाधव, प्रा. प्रीती प्रसादी, पिकुळे येथील श्री शांतादुर्गा माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक सौ. स्नेहल गवस, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे.